# छत्रपती शिवाजी महाराजांची महसूल व्यवस्था

सहा.प्रा.राजेंद्र आनंदा केदार

इतिहास विभाग प्रमुख

श्री ब्रम्हानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,दोडी बु.II

- **प्रस्तावना** :-

महाराष्ट्रात १७ व्या शतकातील राजकीय परिस्थिती अस्थिर होती.महाराष्ट्रातील पुणे,सुपे,चाकण व इंदापूर जहागिरीचा छोटा हिस्सा शहाजी राजे भोसले यांच्याकडे राहिला.शहाजी राजांनी आदिलशहाकडे नौकरी पत्करल्यानंतर या जहागीरीस आदिलशहाने परवानगी दिली.शहाजी राजांनी पुढे कर्नाटकात आपला जम बसविला. महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थिती डोंगर कडे, दऱ्या यांचा उपयोग करून आदिलशाही व इतर यवनीसत्तांचा विरोध डावलून छत्रपती शिवाजी राजांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ महाराष्ट्रात रोवली. मराठी माणसाला जागे करून 'स्वराज्याचा' मंत्र यशस्वी करण्याचा पहिला प्रयत्न छत्रपती शिवाजी राजांनीच केला. शाही सत्ता,मुघल आक्रमणाच्या पारतंत्र्यात होरपळून निघालेली, अन्याय, अत्याचार व जुलूम याने दुखावलेली मराठी बाणांची मने 'स्वराज्य' या शब्दाने पेटून निघाली. छत्रपती शिवाजी राजांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रधर्माचे पुनुरुजीवन पुढील वीस वर्षात झाले. कृषी व्यवस्था हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. शेती ही भारतीय अर्थव्यवस्थेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले जाते. येथील बहुसंख्य प्रजा ही शेतीवरच अवलंबून होती. सतराव्या शतकातील राजकीय स्थित्यंतराचा शेतकऱ्यांचा जीवनावर परिणाम झालेला दिसून येतो. सततचे युद्धाचे प्रसंग, पावसाची अनिश्चितता, आर्थिक सहाय्याचा अभाव, जुलमी राजवट इत्यादीमुळे शेती व्यवसायात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत असे. याचा परिणाम शेती,सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रावर झालेला दिसून येतो.

- **शिवकालीन कृषी व्यवस्था** :-

१७ व्या शतकातील महाराष्ट्राचे आर्थिक जीवन हे शेती व्यवसायावर अवलंबून होते. या काळात शेती व्यवसाय हा मोठ्या प्रमाणावर खेड्यात सुरू होता. खेडे हे आर्थिक व सामाजिक व्यवहारांचे केंद्रबिंदू होते. शेती व्यवसाय हाच प्रमुख व्यवसाय होता. राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन शेती हेच होते. वतनदार प्रत्यक्ष शेती करीत नव्हते. प्रत्यक्ष शेतीवर राबणारा शेतकरी खरा शिवकालीन शेतीचा आधार होता. शिवपूर्वकाळात शाही सत्ता.मुघल आणि तिचे अधिकारी शेतकऱ्यांकडून त्यांच्या उत्पन्नाच्या 50 टक्क्यांपेक्षा जास्त सारा वसूल करत याची छत्रपतींना जाणीव होती. शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर पिळवणूक केली जात होती.परिणामी शेतकऱ्याचीमोठ्या प्रमाणावर उपासमार होत होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी शेतसारा धोरण आखतांना शेतकरी व रयत यांना दिलासा देणारा दृष्टीकोन अवलंबिला होता. गतकाळाचा वारसा म्हणून चालत आलेली कर आकारणीतील सर्व प्रकारची अनिश्चितता तसेच अन्याय व जुलूम जबरदस्तीने लादले गेलेले कर रद्द केले. रयेतेचे व शेतकऱ्याचे प्रेम व सहकार्य मिळवून राज्याचे उत्पन्न छत्रपती शिवाजी राजांनी वाढविले.

- **शिवकालीन महसूल व्यवस्था** :-

महसूल हे स्वराज्याच्या उत्पन्नाचे एक प्रमुख साधन होते.शेतीवरील महसूल निश्चित करण्यासाठी शेतीचे मोजमाप करणे गरजेचे होते. इ.स.1667-1669 मध्ये शिवाजीराजांनी आपले लक्ष जमीन महसूलीच्या व्यवस्थेकडे वळवले.शिवकाळात इ.स.१६३६ला दादोजी

कोंडदेव, इ.स.१६७८ ला अण्णाजी दत्तो,तर इ.स.१६८८ ला मोरोपंत पिंगळे यांची जमिनीच्या अचूक मोजमाप करण्यासाठी नेमणूक केली. शिवाजी महाराजांनी जमीन व्यवस्था लावून देण्याच्या बाबतीत गजाने किंवा काठीने जमीन मोजण्याची मलिक अंबरी पद्धत राबवली.त्या काठीस ‘शिवकाठी’ म्हणून ओळखले जात होते.ही शिवकाठी ८२ तसुंची होती. जमिनमापन पद्धतीमध्ये तसू,हात,काठी,बिघा व चावर ही पाच परिणामे होती. अमीन (मोजणी अधिकारी),काटकर (मोजणीदार),आणि कारकून यांच्यामार्फत जमिनीची मोजणी केली जात.त्यांनी जमिनीची मोजणी करुन पिकाऊ जमिनीची प्रतवारी ठरविली जात. त्यानंतर पिकांची पाहणी करून सारा आकरण्याची पद्धत छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरु केली. इंग्रज शेतीतज्ञ मेजर जाव्हिस म्हणतो, शिव काळात जवळ जवळ बारा प्रकारच्या जमिनीचा विचार होई. पिकाऊ जमिनीची वर्गवारी करण्यात आल्यावर पिकांच्यादृष्टीने त्याचे मुल्यमापन होई.

छत्रपती शिवाजी राजांनी शेतकऱ्यांवर त्यांच्या शेतजमिनीवरील उत्पन्नाच्या २/३ इतका महसूल निश्चित केला होता.शेती महसूल गोळा करण्यासाठी पाटील,कुलकर्णी इ.मुलकी अधिकाऱ्यांची नेमणूक होती.छत्रपती शिवाजी राजांनी शाही सत्ता व मुघल यांच्या प्रमाणे महसूल वसुलीची अंदाधुंदी नाहीशी केली.’रयतेचा वाटा रयतेस पावे आणि राजभाग आपणास येई ते करणे’ अशा आज्ञा राजांनी आपल्या सुभेदारांना दिलेल्या होत्या.सभासद बखरीत केलेल्या उल्लेखाप्रमाणे शेतजमिनीची मोजणी बिघा या मापाप्रमाणे केली जात होती.पिकाला आकार बिघावर ठरविण्यात येई.पिकाचे पाच भाग करून तीन भाग रयेतेला व दोन भाग सरकारला अशी वाटणी केली जात होती.महसुलाची वसुली धान्यरूपाने केली जात होती.शिवाजी राजांनी महसूल व्यवस्थेत बदल करून स्वराज्याचे महसुली उत्पन्न वाढविले.जमीनदारी पद्धती नष्ट करून रयतवारी पद्धती सुरु केली.

- **शिवकालीन शेतीवरील कर-**

१७ व्या शतकात व त्याच्या नंतरच्याही कालखंडात राज्याचे उत्पन्न विविध कर आकारणी करून मिळविले जात होते. महाराष्ट्र इतिहासाची साधने या ग्रंथात डॉ. वा.सी बेंद्रे यांनी अनेक मेस्तकांचा उल्लेख केला आहे. मेस्तक म्हणजे आर्थिक व्यवहारांचे हिशोब कसे ठेवावे याची एक मार्गदर्शन पुस्तिका

जकात :- मालाची वाहतूक व उत्पादनावरील कर

जिराईत :- जिराईत जमिनीवरील कर

बागाईत :- बागायत जमिनीपासून मिळणारे उत्पन्न

बारनगजग :- आंब्याच्या बागेपासून मिळणारे उत्पन्न

बार गुजानन :- वेली पासून होणारे उत्पन्न

बादस्ती :- झाडापासून मिळणारे उत्पन्न

कटूबाग :- पडीक जमिनीपासून मिळणारे उत्पन्न

उपयुक्त उल्लेखित पद्धतीनेच आकारणी होत असे नाही.

- **चौथाई व सरदेशमुखी** :-

प्रबळ राज्यकर्ते दुर्बळ राज्यकर्त्यांकडे चौथाईची व सरदेशमुखीची मागणी करीत होते. आपल्या राज्याच्या रक्षणासाठी आणि युद्ध टाळण्यासाठी दुर्बळ सत्ताधीश चौथाईचे हक्क प्रबळ राज्यकर्त्यांना देत होते. एकूण महसुलाच्या उत्पन्नाच्या १/४ किंवा १/८ भाग हक्क प्राप्त झाले होते.चौथाईच्या मोबदल्यात त्या भागाचे बाह्य शत्रूच्या हल्ल्यापासून रक्षण करण्याची जबाबदारी प्रबळ राज्यकर्ते स्वीकारत होते. असे मत न्या.रानडे व्यक्त केलेले होते. छत्रपती शिवाजी राजांनी चौथाई पद्धतीचा पुरस्कार करून सीमेवरील सत्ताधीशांकडून वारंवार चौथाई मिळवून स्वराज्याचे उत्पन्न वाढवण्यासाठी चौथाईचा उपयोग केला होता.

सुभ्यातील एकूण उत्पन्नाच्या १/१० भागाला सरदेशमुखी असे म्हटले जात होते. सरदेशमुखीचे हक्क बजावणारे अनेक सरदेशमुख छत्रपती शिवाजीच्या काळात होते. रत्नागिरीतील प्रभावळी भाग छत्रपती शिवाजी राजांनी जिंकून घेतल्यानंतर मावळगकर यांनी आपले हक्क सुरक्षित राहावेत म्हणून छत्रपती शिवाजी राजांना विनंती केली होती. स्वराज्याच्या स्थापनेनंतर शिवाजी राजांनी सरदेशमुखीचे अधिकार आपल्याकडे घेतले होते. सरदेशमुखीचे अधिकार स्वराज्यातील भागापुरते मर्यादित होते. .डॉ.ए.आर.कुलकर्णी यांच्या मते, 'Though Shivaji can not be held as the originator of cauth,he was responsible for its wider application'.

- **शिवाजी महाराज यांचा शेती व शेतकऱ्यांविषयी दृष्टिकोन** :-

शिवाजी महाराजांच्या काळात महाराष्ट्राचे आर्थिक जीवन शेती या व्यवसायावर अवलंबून होते. शिवकालीन महाराष्ट्रात खेड्यांचा समावेश मोठ्या प्रमाणावर होता. आणि खेडी ही स्वयंपूर्ण होती. खेड्यातील सर्व व्यवहार खेड्यामध्ये सुरू होते. शेती व्यवसाय हा शिवकालीन अर्थव्यवस्थेचा मुख्य स्त्रोत होता. आणि उपजीविकेचे मुख्य साधन ही होते. शिवकाळात शेतकऱ्यास रयत, कुणबी, रया, कुळवाडी याही नावाने ओळखले जात होत. इ.स. 1676 मध्ये प्रभानवल्लीचा सुभेदार रामजी अनंत यास लिहिलेल्या पत्रात लिहिले आहे की, 'रयतेकडून भाजीच्या देठाचीही अपेक्षा न करता रास्त आणि बिनचुक वर्तन केले पाहिजेत'. हे पत्र राज्याभिषेकानंतरचे आहे. हे पत्र इतके मोलाचे आहे की त्यातील विचारधन आजही शेतीचा विकास करण्याच्या कामी उपयुक्त ठरावे. शेतीच्या उत्पन्नात रयतेचा वाटा रयतेला मिळेल आणि सरकारचा वाटा सरकारला मिळेल असेच वर्तन करावे. रयतेवर काडीचाही जुलूम केला अथवा गैरवर्तन केले तर राजे तुमच्यावर नाराज होतील हे पक्के समजावे, असेही पत्रात म्हटले आहे.

- **शेतकऱ्यांविषयी दृष्टिकोन** :-

शेतीवर राजांची अनन्यसाधारण भक्ती होती. रयत ही 'लेकरासमान' ही भावना होती. राजांकडे दूरदृष्टी होती. ते एका पत्रात लिहितात 'रात्री दिवे मालवून झोपा कारण दिव्यातील वात उंदीर पळून नेतील आणि त्यामुळे गवताची गंज जळून जाईल'. गाई, वासरे, उपाशी असून भावी पिढीला दूध मिळणार नाही रयत सुखी तर राजा सुखी. हे महाराजांच्या कल्याणासाठी नव्हे तर बहुसंख्य रयतेच्या कल्याणासाठी ही भावना त्यांच्या अनेक आशा पत्रातून व्यक्त झालेली आहे. म्हणूनच अनेक इतिहासकार त्यांना 'रयतेचा राजा' असे म्हणूनही वर्णन करत. शिवपूर्वकाळात राजकीय अस्थिर परिस्थितीमुळे कृषी जीवन उद्ध्वस्त झाले होत. अशा परिस्थितीत सोन्याच्या नांगराने नांगरण्यासारख्या कृतीला प्रतिकात्मक अर्थ फार मोठा होता. राजसत्तेने शेतकऱ्याला आश्रय दिला. असा याचा अर्थ होतो. मावळच्या प्रदेशात विस्कटलेल्या शेती व्यवसायाची घडी बसवण्याचा प्रयत्न शिवाजी राजांनी केला.

यादव काळापासून महाराष्ट्रात वतनदारी परंपरा निर्माण झाली होती. इस्लामी राज्यकर्त्यांनी या अन्यायकारक वतनदारी पद्धतीची जोपासना केली. बहामनी काळात वतनदारांनी राज्यकर्त्यांना खुश करण्यासाठी आणि महसूल गोळा करण्यासाठी शेतकऱ्यांवर आणि रयतेवर निष्ठुरपणे अन्याय व अत्याचार केले. शिवाजी महाराजांनी या गुंड प्रवृत्तीच्या वतनदारीपद्धतीचा अत्यंत तिटकारा होता. शेतकरी व रयतेवरील अन्नाय व अत्याचार दूर करण्यासाठी वतनदारी पद्धती बंद करण्याचा प्रखर विचार होता. शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्याला थोडेसे स्थैर्य प्राप्त ह झाल्यावर त्यांनी आपल्या देशातील गरीब शेतकऱ्यांना कसे सुखी करता येईल त्याचा प्रामुख्याने विचार केला. कारण 'रयतेचे हित हेच राजाचे आणि राज्याचे हिते' याची त्यांना पूर्णपणे जाणीव होती. म्हणूनच त्यांनी रयतेला जुलमी जमीनदारांपासून मुक्त केले. सर्वप्रथम त्यांनी पाटील, कुलकर्णी, देशमुख इ. आपल्या अंकित करून घेतले आणि त्यांच्या वर्चस्वाखाली असलेल्या रयतेची मुक्तता करून 'राजा आणि प्रजा' यांचे प्रत्यक्ष सबंध प्रस्थापित केले.

पडीक जमिनी लागवडीखाली आणण्यासाठी महाराजांनी शेतकऱ्यांना शेतसाऱ्याबाबत मोठ्या सवलती देऊ केल्या. तुमच्या जमिनीवर 4 वर्षापासून ते 12 वर्षापर्यंत अंशत: करवसुली होईल असे त्यांना आश्वासन दिले. सरकारने लोकांच्या ठिकाणी विश्वास निर्माण करुन अधिकाधिक पड जमिनी लागवडीखाली आणून राज्याचे उत्पन्न वाढविले.एखाद्या गावात पूर आला असेल, किंवा लागोपाठ दोन वर्षे अवर्षणाची स्थिती असेल किंवा गावाचा प्रदेश शत्रुसैन्याने उद्ध्वस्त केला असेल तर सरकार उदारपणे गावकऱ्यांना जमिनीवरील व इतर करात सुट देई. गरीब शेतकऱ्यांना बैलजोड्या, नांगर यासारखी अवजारे व पेरणीसाठी बि-बियाणे पुरवून मदत करण्यात यावी असा शिवाजी महाराजांचा हूकूम होता.बी-बियाणांचा पैदास खास करुन सरकारी जमिनीत होत असे. 'बोजहुडी' या नावाने त्यांना गावकऱ्यांना पुरवठा करीत. महाराजांनी इनाम जमिनी देखील पडीक राहू दिल्या नाहीत. अशा जमिनी त्यांनी काढून घेतल्या आणि धार्मिक संस्थांनी नापीक किंवा पडजमिनी लागवडीखाली आणून धान्योत्पादन वाढवावे या उद्देशाने त्यांनी अशा जमिनी त्यांना इनाम म्हणून दिल्या.

- **शिवकालीन जमिनी विषयी सुधारणा**

  - स्वराज्यातील सर्व जमिनीचे अचूक मोजमापन केले.
  - नापीक व पडजमिनी लागवडीखाली आणल्या.
  - जमिनीची पाहणी करुन शेतीचे उत्पन्न निश्चित केले.
  - कोणत्याही आपत्तीपासून पिकांच्या शेतकऱ्यांच्या व गांवकऱ्यांच्या रक्षणाची व्यवस्था केली.

१७ व्या शतकात शेतकऱ्यांला कोणकोणते कर व पट्टया द्याव्या लागत होत्या याची कल्पना आल्यास छत्रपती शिवाजी महाराजाच्या जमीन-महसूलीविषयीच्या धोरणाचे व सुधारणांचे मोल यथार्थपणे आपल्याला कळून येईल. यापूर्वीच्या शासनाच्या काळात शेतकऱ्यांना तेलपट्टी, तूटपट्टी, जंगमपट्टी या सारखे सुमारे 50 पट्टया व कर भरावे लागत. या करांपैकी बहुतेक कर महाराजांनी रद्द करुन एकूण 40 टक्के कर वसूल केला.

शिवाजी महाराजांनी घालून दिलेल्या जमीन महसूल पद्धतीत राज्याचे व शेतकऱ्यांचे हितसंबंध वेगळे मानले गेले नाहीत हे त्यांच्या धोरणाचे विशेष होते. जार्व्हिसच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे शिवाजी महाराजांच्या शेतीविषयक आणि जमीन महसूलाबंधीच्या धोरणाने शेतकऱ्यांवर व कुळांवर विस्मयकारक परिणाम घडून आला. शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील जमिनीचा सर्व पृष्ठभाग, जमिनीचा प्रत्येक तुकडा व डोंगराळ भाग लागवडीखाली आणून तेथे पोषक व उपयोगी झाडाझुडपांची जोपासना केली.

शिवाजी महाराजांचे राज्य जनतेच्या सहकार्यामुळे विकास पावले ही विचारार्ह गोष्ट आहे. महाराजांच्या जमिनीची व महसूलीची काळजीपूर्वक पाहणी करुन जार्व्हिस याने असे अनुमान काढले की गोंधळ, लढाया आणि द्रोह करण्याच्या सार्वत्रिक वृत्तीचा हा काळ

असून देखील महसूल व्यवस्था आणि जनता यांची स्थिती सुधारली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या या कार्यामुळेच जनतेने ‘रयतेचा राजा’ (शेतकऱ्यांचा राजा) ही त्यांना मानाची सर्वोच्च पदवी दिली.

- **निष्कर्ष :-**

१) शिवकाळात शेती हा अर्थव्यवस्थेचा कणा होती.म्हणून शिवाजी राजांनी शेतीत अनेक सुधारणा केल्या.
२) शिवाजी महाराजांनी शेती हाच अर्थकारणाचा कणा होता .म्हणून सर्व परिस्थितीचा विचार करून कृषी धोरण निर्धारित केले.
३) शिवाजी महाराजांची शेतकऱ्यांविषयीचा दृष्टिकोन आपल्या पुत्रासारखा होता.
४) शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी व पिकांच्या संरक्षणासाठी प्रशासनाच्या मदतीने प्रयत्न केले.
५) शिवाजी महाराजांनी कृषी धोरणाचा पुरस्कार करताना योग्य वेळी बी- बियाणे, खते, पाणीपुरवठा, सरकारी कोठारातून धान्य पुरवठा करण्याची व्यवस्था केली.
६) छत्रपती शिवाजी राजानी स्वराज्याच्या उत्पन्न वाढीसाठी चौथाई व सरदेशमुखी सुरु केली.

**संदर्भ ग्रंथ :-**


Dr.Kulkarni A.R. Maharashtra in the age of Shivaji , Daimand Publication, Pune

प्रा.ह.श्री. शेनोलीकर, डॉ. प्रणव देशपांडे, महाराष्ट्र सांस्कृतिक घडण आणि विकास, मोघे प्रकाशन, कोल्हापूर

डॉ.अ.रा. कुलकर्णी, ग. ह. खरे, मराठ्यांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

डॉ.सर्जेराव भामरे, शिवाजी राजांची महसूल व्यवस्था लेख, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

जयसिंगराव भाऊसाहेब पवार,मराठी सत्तेचा उदय,पृथ्वी पब्लिकेशन्स,पुणे

डॉ.अ.रा.कुलकर्णी, महाराष्ट्र समाज आणि संस्कृती, डायमंड पब्लिकेशन्स,पुणे

राजवाडे वि.का.(संपा.)महाराष्ट्रातील इतिहासाची साधने,खंड १८ वा

संजय गायकवाड,बळीराजाचे कैवारी छ.शिवाजी महाराज लेख

महाजन बी.डी.,मध्यकालीन भारत,एस.चंद्रा प्रकाशन, नई दिल्ली

प्रा.द.श्री.शेणीलीकर,डॉ.प्र.रा.देशपांडे,महाराष्ट्राचा सामाजिक,सांस्कृतिक इतिहास,के.सागर. पब्लिकेशन्स,पुणे